# मराठी विज्ञान परिषद

विज्ञान भवन, वि. ना. पुरव मार्ग, शीव-चुनाभट्टी, मुंबई 400 022.

दूरध्वनी क्र. 2405 4714 / 2405 7268 ई-मेल : office@mavipamumbai.org, Web site : www.mavipamumbai.org

**नोदणी क्रमांक :** सोसायटी रजिस्ट्रेशन ॲक्ट : BOM 81/66/GBBSD दिनांक 12-8-1966

बॉम्बे पब्लिक ट्रस्ट ॲक्ट : F - 1429/BOM दिनांक 6-9-1966

# उपक्रम

## 1. विज्ञान मंडळ व पर्यावरणाच्या दृष्टिकोनातून एक कि. मी. परिसराचा अभ्यास

विद्यार्थ्यांनी या वयोगटात क्रियाशील कामातून प्रत्यक्ष कामाचा आनंद घेतला तर नंतर समाजात एक समंजस व वैज्ञानिक दृष्टिकोन असलेल्या नागरिकांची भूमिका ते प्रभावीपणे निभावू शकतील अशा संकल्पनेभोवती या मंडळाची आखणी केली आहे.

। **प्रकल्पाचे स्वरूप** - 7 वी चे 20 विद्यार्थी किंवा जेथे मंडळे आधीपासून चालू आहेत तेथे 7 वी चे विद्यार्थी आणि मागील विज्ञान मंडळातील 7 वी चे (आता 8 वी चे विद्यार्थी) असे साधारण 40 विद्यार्थी. (विज्ञान मंडळात प्रथम नाव नोंदवणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रथम प्रवेश द्यावा.)

आठवड्यातून एक दिवसातील दोन तास विद्यार्थी एकत्र जमतात व विज्ञान मंडळ चालवितात.

। **मुख्याध्यापकांकडून अपेक्षा**

1) विज्ञान मंडळासाठी मार्गदर्शक शिक्षक नेमणे. 2) विज्ञान मंडळासाठी एक वर्ग ठरवलेल्या दिवसासाठी उपलब्ध करून देणे. 3) विज्ञान मंडळाचा आठवड्यातील दिवस व वेळ ठरवून देणे. 4) विज्ञान मंडळाचा मासिक - वार्षिक अहवाल पाहून मार्गदर्शक शिक्षक, विद्यार्थी परिषदेचा कार्यकर्ता व मराठी विज्ञान परिषद यांना योग्य त्या सूचना देणे.

। **मार्गदर्शक शिक्षकांकडून अपेक्षा**

1) विज्ञान मंडळ प्रकल्प व साहित्य नीट वाचून समजावून घेणे. 2) विज्ञान मंडळातील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणे.
3) परिसर अभ्यासांमध्ये मदत करणे. 4) उपस्थित विद्यार्थ्यांच्या नोंदी ठेवणे (कारण या विद्यार्थ्यांना वर्षानंतर सदर उपक्रमाचे प्रमाणपत्र देण्यात येते.)5) मासिक अहवाल वेळोवेळी मुख्याध्यापकांना देणे, वार्षिक अहवाल देणे. 6) आवश्यकतेनुसार मराठी विज्ञान परिषदेशी संपर्क साधणे.

ह्या शाळेने प्रकल्प किमान तीन वर्ष चालू ठेवावा म्हणजे ती शाळा पुढे स्वतंत्रपणे विज्ञान मंडळ चालवू शकेल.

। **परिषदेला शाळेकडून प्रकल्पाच्या दृष्टीने हव्या असलेल्या नोंदी व अपेक्षा**

1) शाळेच्या 1 कि.मी. परिसराचा नकाशा व त्याची संपूर्ण माहिती उदा. कारखाने, संस्था, शाळा, हॉस्पिटले, हॉटेल्स वगैरे.2) शाळेतील गळणारे नळ व त्यातून वाया जाणारे पाणी मोजणे व ते दुरुस्त करून घेणे. 3) आपल्या परिसरातील झाडे-पक्षी ओळखणे. 4) वाहनांच्या नोंदी घेणे. 5) विज्ञान मंडळाचे काम मंडळातील विद्यार्थ्यांमार्फत, प्रदर्शन, व्याख्याने, नाटिकांमार्फत शाळेतील इतर विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविणे.

**शुल्क : एका शाळेकडून वार्षिक शुल्क रु. 100/-**

। मराठी विज्ञान परिषदेतर्फे चालविल्या जाणाऱ्या विज्ञान मंडळाचे संपूर्ण वर्षाच्या अभ्यासक्रमाचे पुस्तक शाळेला दिले जाईल. यामध्ये शास्त्रज्ञांची माहिती, विज्ञान फलक, विज्ञान कोडी, पर्यावरणाच्या दृष्टिकोनातून 1 कि.मी. परिसर अभ्यास, निरनिराळ्या उपक्रमांची माहिती व कृतिपुस्तिका लिखित स्वरुपांत विस्तृतपणे दिलेले असते. । आवश्यकतेनुसार शिक्षकांचे शिबिर घेण्यात येईल.

## 2. विज्ञान भवन भेट : एक विज्ञान सफर

विज्ञान भवनात येणाऱ्या विद्यार्थ्यांना विज्ञान भवनाची भेट अविस्मरणीय ठरावी म्हणून त्यांच्यासाठी या सफरीत मुलांना आवडतील अशा अनेक विज्ञान विषयक गोष्टी ठेवल्या आहेत.

। भित्तीचित्रांच्या सहाय्याने शास्त्रज्ञ, झाडे, पक्षी, पाणी, जमीन, आरोग्य, ऊर्जा विषयक माहिती. । पाणलोट क्षेत्र, मुंबई - महाराष्ट्राचे उंचवट्याचे नकाशे । कार्यक्षम चूल, सूर्यचूल, शोषखड्डा, युरिया खड्डा । गच्चीवरील बगीचा, शालेय वनस्पती बगीचा । रस्त्यावरील वाहनांचे प्रमाण, प्रत्यक्ष मोजणी व निष्कर्ष । मानवी अवयव । 20 सोपे वैज्ञानिक प्रयोग मुले स्वत: करतील. । वेगवेगळ्या विषयावरील स्लाईड शो, फिल्म-स्ट्रीप शो । व्यक्तीमत्त्व विकास विज्ञान कोडी, खेळणी तयार करणे, विज्ञान खेळ व इतर

एका विद्यार्थ्यामागे रु. 25/- इतके शुल्क आकारले जाते. जास्तीत जास्त साठ व कमीत कमी चाळीस विद्यार्थ्यांसाठी हा कार्यक्रम करणे आम्हास सोयीचे होईल. शाळेतील एका वर्गात सरासरी साठ विद्यार्थी असतात असे लक्षात घेऊन20-20-20 असे विद्यार्थ्यांचे तीन गट करून हा कार्यक्रम घेतला जातो.

कार्यक्रमाची वेळ सकाळी 11.00 ते 4.30. मुलांनी येताना जेवणाचा डबा आणावा.

## 3. निरंतर विज्ञान शिक्षण कक्ष

मुलांना प्रत्यक्ष हाताच्या कामाचा अनुभव मिळावा, आनंद मिळावा, दैनंदिन जीवनातील फ्युज लावणे, वॉशर बसवणे या गोष्टी करता याव्यात; त्याचबरोबर जमीन, पाणी आपला परिसर, पक्षी, झाडे याविषयी आत्मीयता निर्माण व्हावी या हेतूने परिषदेच्या विज्ञान भवनात निरंतर विज्ञान शिक्षण कक्ष उभारण्यात आला आहे. असाच एक कक्ष शाळेमध्ये उभारता येईल.

- **शाळेकडून परिषदेला लागणारी मदत**

1) शाळेच्या सोयीचे दिवस 2) शाळेचे कमीतकमी 2 वर्ग, जास्तीत जास्त 4 वर्ग : या वर्गात निरंतर कक्ष उभारला जाईल.

3) एका वर्गात 25-30 मुले एक तास काम करतील. याप्रमाणे वर्गातील विद्यार्थ्यांना निरंतर विज्ञान कक्षात पाठविणे.

विद्यार्थ्यांना रु. 10/- प्रत्येकी आणण्यास सांगणे. परिषदेचे कार्यकर्ते पूर्णवेळ येथे हजर राहून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतील.

निरंतर विज्ञान शिक्षण कक्षात पाण्याचा गळका नळ, वाया जाणारे पाणी, वीज बचत, वॉशर लावणे, फ्युज लावणे, मुंबईचा उंचवटयाचा नकाशा, पाणलोट क्षेत्र, पृथ्वीवरील पाणी, मातीचे प्रकार, झाडे, पक्षी, सूक्ष्मदर्शकातून निरीक्षण हे विषय घेतले जातात. शुल्क रु.10/- प्रतिविद्यार्थी.

## 4. विज्ञान प्रयोग मेळावा

विद्यार्थ्यांना प्रयोग करायला खूप आवडतात व त्यांचे स्वत:चेही अनेक प्रयोग व विचार चालू असतात.

शाळेत शिकवली जाणारी विज्ञान विषयक कठीण वाटणारी तत्त्वे या मेळाव्यातील सोप्या सोप्या प्रयोगातून मुलांना कळायला लागतात व स्वत: प्रयोग केल्याचा आनंदही हे विद्यार्थी मिळवितात.

- **शाळेकडून लागणारी मदत**

शाळेचे 3-4 वर्ग उपलब्ध करून देणे. विद्यार्थी गट देणे, विद्यार्थ्यांकडून शुल्क आकारून रक्कम परिषदेला देणे.

- **स्वरुप** - शाळेच्या 3 ते 4 वर्गात किंवा मोठ्या हॉलमध्ये साधारण 30 प्रयोग मांडले जातात. दिलेल्या माहितीवरून मुले स्वत: प्रयोग करतात व निरीक्षणे करून त्याचे उत्तर काढण्याचे प्रयत्न करतात. परिषदेचे कार्यकर्ते यांना मार्गदर्शन करतात. सर्वात शेवटी मुलांकडून उत्तरे शोधत योग्य उत्तर मुलांना सांगितले जाते. यासाठी 80 ते 100 विद्यार्थ्यांचा गट घेतला जातो. सर्व प्रयोग करण्यासाठी अवधी असतो चार तास. हे चार तास शाळेच्या सोयीनुसार परंतु एकाच दिवशी घेण्यात येतील. प्रत्येक मुलांकडून प्रयोग साहित्य खर्च म्हणून रु. 25/- इतके शुल्क घेतले जाते.

## 5. गणित प्रयोग मेळावा

विद्यार्थ्यांना गणिताची भीती किंवा नावड असते. विद्यार्थ्यांची गणिताविषयीची भीती जावी आणि गणितात त्यांना मजा वाटावी या हेतूने अनेक प्रयोग करून 'गणिताच्या पद्धतीची' विद्यार्थ्यांना ओळख करू दिली जाते. प्रयोग करून 'गणित' समजावून घेतल्याने त्यांचा पाया पक्का होतो. दोन दिवसांत (10 तास) 'गणित : एक पद्धत, गणितातील गंमती जमती, क्षेत्रफळ, घनफळ, वर्तुळ, व्यास-परिघाचा संबंध, अर्धवर्तुळातील कोन, ऑयलरचे सूत्र' इ. विषय घेतले जातात.

प्रत्येक विद्यार्थ्याकडून रु. 25/- प्रति दिन इतके शुल्क घेतले जाते. एका वर्गात किमान 40 विद्यार्थी घेतले जातात.

## 6. परिसरातील साहित्यातून विज्ञान खेळणी शिबिर

यामध्ये सभोवतालच्या परिसरातून मिळणाऱ्या वस्तुंपासून वेगवेगळी खेळणी तयार करायला मुलांना शिकवले जाते. त्या खेळण्यामागचे वैज्ञानिक तत्व खेळता खेळता उलगडावे, स्वत:च्या हाताने खेळणी करण्याचा व खेळण्याचा आनंद घ्यावा यासाठी हे शिबिर घेण्यात येते.

4 दिवसांच्या शिबिरात 40 खेळणी शिकवली जातात. त्यामागचे तत्त्व समजावून दिले जाते. एका मुलामागे रु.400/- इतके शुल्क घेण्यात येते. एक दिवसाच्या शिबिरात 15 खेळणी शिकवली जातात. त्याचे शुल्क प्रतिविद्यार्थी रु. 25/- इतके घेतले जाते. किमान 40 जणांच्या गटासाठी हे शिबिर घेणे सोईस्कर पडते अन्यथा दिवाळीच्या वा उन्हाळ्याच्या सुट्टीत परिषदेत विद्यार्थी वैयक्तिकरित्या सहभागी होऊ शकतात.

## 7. आकाशदर्शन

रात्री आकाशात अनेक तारे असतात. किमान ठळक तारे आणि ग्रहांची ओळख व्हावी या उद्देशाने हा वर्ग मराठी विज्ञान परिषदेच्या विज्ञान भवनातच अमावस्येच्या आसपासच्या एखाद्या दिवशी घेण्यात येतात. सप्टेंबर ते मे या महिन्यांमध्ये मुख्यत्वे हे वर्ग विद्यार्थ्यांसाठी घेतले जातात. प्रतिव्यक्ती रु. 10/- इतके शुल्क घेतले जाते. शाळेमध्ये हा कार्यक्रम आयोजित करावयाचा असल्यास परिषदेकडे संपर्क साधावा.

मुंबईच्या बाहेर आकाशदर्शन हवे असल्यास मराठी विज्ञान परिषदेचे कार्यकर्ते स्लाईड शो तसेच दुर्बिणीच्या सहाय्याने आकाशदर्शन कार्यक्रम दाखवतील. याचे शुल्क प्रती व्यक्ती रु. 25/- राहील.

## 8. सूर्यचूल शिबिर / सौरबंब शिबिर

ऊर्जेचा प्रश्‍न दिवसेंदिवस बिकट होत आहे. सूर्यऊर्जेचा वापर अन्न शिजवण्यासाठी सूर्यचूलीमार्फत आपण करू शकतो. घरच्या घरीही कमी किंमतीत सूर्यचूल आपण कशी करू शकतो, याचे दोन दिवसांचे सूर्यचूल प्रशिक्षण शिबिर घेतले जाते. सूर्यचूलीचे तत्व, सूर्यचूल बनवणे, सूर्यचूलीचे परीक्षण इ. गोष्टींचा समावेश शिबिरात आहे. शाळांना आपल्या विद्यार्थ्यांसाठी किंवा संस्थांमार्फत प्रौढांसाठी हे शिबिर ऑक्टोबर ते मे या महिन्यांच्या कालावधीत घेण्यात येते. दोन दिवसांच्या शिबिराचे शुल्क रु.150/- प्रतिव्यक्ती आहे.

सौरबंब शिबिरातही सूर्यऊर्जेचा वापर पाणी तापवण्यासाठीही करू शकतो. त्यासाठी सौरबंब कसा तयार करायचा याचे प्रशिक्षण शिबिर घेतले जाते. दोन दिवसांच्या शिबिराचे शुल्क रु. 200/- प्रतिव्यक्ती आहे.

## 9. विज्ञानमित्र

वार्षिक परीक्षा किंवा सहामाही परीक्षा संपल्यानंतर लगेच विज्ञानमित्र शिबिर घेतले जाते. सात दिवसांच्या या शिबिरात प्रामुख्याने इ.7 वी ते 9 वीच्या विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जातो. ऊर्जा, आरोग्य, पर्यावरण, जमीन, पाणी या विषयांबरोबरच महासागर, अवकाश, संगणक, लोकसंख्या इ. विषय एका मुख्य विषयाच्या अनुषंगाने घेतले जातात. एक दिवस मुंबईबाहेर निसर्गसहल असते. यामध्ये पाणलोट क्षेत्र, पक्षी निरीक्षण, आकाशदर्शन इ. गोष्टी घेतल्या जातात. प्रतिविद्यार्थी शुल्क रु. 400/-.

हे शिबिर शाळेमध्ये घ्यायचे असल्यास मराठी विज्ञान परिषदेकडे संपर्क साधावा. (शुल्क रु.450/- प्रति विद्यार्थी)

## 10. शालांत परीक्षेस बसणाऱ्या विद्यार्थ्यांकरिता प्रयोग प्रात्यक्षिक सराव वर्ग

इ. 10 वी तील विद्यार्थ्यांसाठी शाळेमध्ये प्रयोग घेतले जातात परंतु या प्रयोगांचा सराव करण्याची आवश्यकता विद्यार्थ्यांना वाटत असते. ह्या प्रयोगांचा सराव करताना विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास यावा यासाठी 'प्रयोग प्रात्यक्षिक सराव वर्ग' सुरु करण्यात आले आहेत. भाग 1 व भाग 2 मधील सर्व प्रयोग विद्यार्थ्यांना त्याचे समाधान होईपर्यंत येथे करता येऊ शकतात. प्रयोगासंदर्भात मार्गदर्शनही दिले जाते. त्यासाठी प्रतिविद्यार्थी शुल्क रु.400/- (मराठी विज्ञान परिषदेमध्ये) घेतले जाते. शाळेमध्ये / संस्थेमध्ये येऊनही वर्ग घेता येतील. (शुल्क रु. 450/- प्रतिविद्यार्थी)

## 11. विद्यार्थ्यांसाठी प्रयोगशाळा

प्रत्येक विद्यार्थ्याला शाळेतले प्रयोग करून पहावेसे वाटतात. परंतु शाळेमध्ये सर्व प्रयोग त्याला करावयास मिळतीलच असे नाही. प्रयोगाविषयीची मुलांची भीती जावी, प्रयोगाची उपकरणे हाताळण्याचा आत्मविश्वास यावा, प्रयोग करणे, निरीक्षण करणे, नोंदी ठेवणे आणि निष्कर्ष काढणे या वैज्ञानिक पद्धती त्यांनी वापरून वैज्ञानिक तत्व शोधावे यासाठी दोन गटात शालेय तसेच त्यावर आधारीत इतर प्रयोग घेतले जातात. लहान गटात5 वी, 6 वी, 7 वी चे प्रयोग असतात. शुल्क रु. 350/- प्रती विद्यार्थी तर मोठ्या गटात (8 वी, 9 वी चे विद्यार्थी) 8 वी ते 10 वी च्या अभ्यासक्रमाशी संबंधीत प्रयोग असतात. शुल्क रु. 400/- प्रति विद्यार्थी. (मराठी विज्ञान परिषदेमध्ये)

शाळेमध्ये / संस्थेमध्ये येऊनही प्रयोग घेतले जातात. (शुल्क रु.450/- प्रतिविद्यार्थी)

## 12. वयात येताना

मुलींसाठी 'मुलगी वयात येताना' आणि मुलांसाठी 'मुलगा वयात येताना' हे कार्यक्रम परिषदेतर्फे दाखवले जातात. मुलगा - मुलगी वयात येताना, त्यांच्यात होणारे शारीरिक व मानसिक बदल या विषयाची शास्त्रीय माहिती दृकश्राव्य माध्यमाद्वारे विद्यार्थ्यांना सांगितली जाते. त्यावर विद्यार्थ्यांमध्येच चर्चा घडवून आणली जाते. साहजिकच या कार्यक्रमानंतर मनात असलेले अनेक गैरसमज दूर तर होतातच पण शारीरिक - मानसिक स्वास्थ्यासाठी आवश्यक - अनावश्यक गोष्टीतील फरक हा त्यांना निश्चितच कळून येतो.

हाच कार्यक्रम शाळेच्या सहकार्याने विद्यार्थ्यांच्या पालकांनाही दाखवल्यावर त्याचा चांगला परिणाम दिसून आलेला आहे. एक तासाच्या एका कार्यक्रमात साठ ते सत्तर उपस्थिती असावी. पुरेसा अंधार होणारा वर्ग किवा हॉल व विजेचे कनेक्शन या गोष्टींची मदत आम्हाला शाळेकडून लागेल.

एका कार्यक्रमासाठी रु. 200/- आणि प्रवासखर्च इतके शुल्क आकारले जाईल.

## 13. एड्स

वयात येताना या कार्यक्रमासारखाच एड्स बद्दलचे गैरसमज दूर करणारा शास्त्रीय माहिती देणारा दृकश्राव्य कार्यक्रम घेतला जातो.

आवश्यक विद्यार्थी संख्या, कालावधी, शुल्क इ. वरीलप्रमाणे

## 14. संवाद

संवादचा चार पानी एक अंक याप्रमाणे वर्षभरात आठ अंक विद्यार्थ्यांना मिळतील. याविषयीची अधिक माहिती कार्यालयात विचारावी.

## 15. विज्ञान सहल

एखाद्या कारखान्याला / संस्थेला भेट दिल्यास विद्यार्थ्यांना बऱ्याच गोष्टी कळतात. अशी सहल परिषदेतर्फे आयोजित केली जाते. कॉटन रिसर्च सेंटर, वूल रिसर्च सेंटर, पाणी पुरवठा केंद्र, उदंचन केंद्र, दुग्धालय अशा ठिकाणी सहल नेली जाते. शुल्क रु.200/- प्रति व्यक्ती.

## 16. शिक्षकांसाठी कृतिसत्र

शैक्षणिक वर्षात शिक्षकांसाठी एकूण चार कृतिसत्रे घेतली जाते. या कृतिसत्रांत संस्था भेटी, निसर्ग सहल, अभ्यासक्रमावर आधारीत कार्यशाळा असे स्वरुप असते. यासाठी इच्छुकांनी जुलैमध्ये कार्यालयात संपर्क साधावा.

## 17. शहरी शेती

डॉ. दोशी सिटी फार्मिंग इन्स्टिट्यूटतर्फे मराठी विज्ञान परिषदेत ''शहरी शेती'' प्रकल्प राबविला जातो. या प्रकल्पात ''आपल्या परिसरात उपलब्ध असलेला जैविक कचरा वापरून घराला लागणारा भाजीपाला घरातच पिकवण्याचे तंत्र'' विकसित करण्यात आले आहे. या तंत्राचा वापर करून परिषदेच्या गच्चीत भेंडी, गवार, मुळा, चवळी, दूधी, दोडका, केळी, कारलं, मका, रताळं अशी पिकांची आणि डाळींब, पेरू, अंजीर, सिताफळ, चिकू अशा फळांची लागवड केलेली आहे. या तंत्राचा जास्तीत जास्त लोकांना फायदा व्हावा म्हणून परिषदेत या संबंधीत एक दिवसाचा ''शहरी शेती'' वर्ग घेण्यात येतो. त्यासाठी रु. 100/- प्रतिव्यक्ती इतके शुल्क घेण्यात येते. शाळांमध्येही हा कार्यक्रम विद्यार्थ्यांसाठी घेतला जातो. शालेय विद्यार्थ्यांसाठी शुल्क रु. 50/- प्रतिविद्यार्थी आकारण्यात येईल.

## 18. मराठी विज्ञान परिषदेची स्वस्त दरातील प्रकाशने

शाळेतील विद्यार्थ्यांसाठी विज्ञान विषयक पुस्तकांच्या वाचनाची सवय लागावी याकरिता स्वस्त किमतीची छोट्या पुस्तिका प्रकाशित केल्या आहेत. या पुस्तिका परिषदेत येऊन खरेदी करणे बऱ्याच विद्यार्थ्यांना इच्छा असूनही जमू शकत नाही. यासाठी आपल्या शाळेत येऊन विद्यार्थ्यांसाठी सलग दोन दिवस पुस्तक विक्री करण्यात येईल. आपले सोयीचे दिवस कळवावे.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 1. | बाल वैज्ञानिकांकरिता प्रयोग संच | रु. 40/- | 8. | वयात येताना - मुलांसाठी प्रश्नोत्तरी | रु.10/- |
| 2. | खेळातून विज्ञान | रु. 10/- | 9. | स्त्री शरीर विज्ञान प्रश्नोत्तरी | रु. 8/- |
| 3. | Science Through Game | रु. 10/- | 10. | पोस्टकार्डातून विज्ञान | रु. 8/- |
| 4. | Science of the Female Body | रु. 10/- | 11. | विज्ञान शिक्षण पूरक साहित्य | रु. 8/- |
| 5. | Science Through Post-Cards | रु. 10/- | 12. | परिसरातून विज्ञान शिक्षण साहित्य | रु. 5/- |
| 6. | Science Quest (Biology) | रु. 10/- | 13. | विज्ञान जिज्ञासा | रु. 5/- |
| 7. | कार्यक्षम चूल, सूर्यचूल व सूर्यचूलीवरील पाकक्रिया | रु. 10/- | 14. | निरंतर विज्ञान शिक्षण कक्ष | रु. 5/- |

## 19. प्रदर्शन

आहार व आरोग्य, अवकाश, समुद्रविज्ञान, तरंग, दैनंदिन जीवनातील विज्ञान, विज्ञान आणि गणित इ. प्रदर्शने परिषदेत उपलब्ध आहेत. याशिवाय 12वी नंतर काय करावे, याची माहिती विद्यार्थ्यांना 8वी-9वी पासून असणे आवश्यक आहे. त्या दृष्टीनेही 12वी नंतरच्या अभ्यासक्रमांची माहिती देणारे प्रदर्शन परिषदेमध्ये आहे.

एक प्रदर्शन एका आठवड्यासाठी आपल्या शाळेत लावायचे असल्यास रु.250/- इतके शुल्क घेतले जाते. प्रदर्शन नेणे आणि पुन्हा सुस्थितीत आणून देणे ही जबाबदारी त्या शाळेची / संस्थेची राहील.

## परिषदेचे सभासदत्त्व

### x सभासदांसाठी

विद्यार्थी सभासदाला वर्षाचे 8 संवादचे अंक घरपोच येतील. परिषदेचे संदर्भालय वापरायला मिळेल. यासाठी वार्षिक वर्गणी फक्त रु. 30/- घेतली जाते, तर प्रौढ सभासदांसाठी वार्षिक वर्गणी रु. 60/- घेतली जाते.

### x पत्रिका सभासद

कोणत्याही वयोगटाची व्यक्ती 'पत्रिकेची' सभासद होऊ शकते. परिषदेतर्फे दर महिन्याला पत्रिका हे मासिक प्रकाशित होते. त्याची वार्षिक वर्गणी रु. 160/- आहे आणि आजीव वर्गणी रु. 3000/- घेतली जाते.